**RNI No. MAHBIL /2009/31733**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

**वर्ष १, अंक २८(२)]** **मंगळवार, एप्रिल २८, २०१५/वैशाख ८, शके १९३७** **[पृष्ठे ९, किंमत : रुपये १५.००**

### असाधारण क्रमांक ६१

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामान्य प्रशासन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ एप्रिल २०१५

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र. १५६/कार्या. १२.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान केलेल्या प्राधिकाराचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, “ महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली, २०१० ” आणि महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर पदोन्नतीने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली, २०१० या दोन्ही नियमावली आणि यासंदर्भातील सर्व शासन निर्णय, आदेश इ. रद्द करून पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांस “ महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५ ” असे म्हणावे.

२. हे नियम ज्या दिनांकास अधिसूचित होतील, त्या दिनांकापासून गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित ) मधील सरळसेवेने व पदोन्नतीने भरावयाच्या पदांवर महसुली विभाग वाटप संदर्भात लागू होतील :

परंतु, जी पदे सेवाप्रवेश नियमानुसार राज्य स्तरावर बदलीपात्र आहेत अशा पदांनाच हे नियम लागू होतील :

परंतु आणखी असे की, हे नियम वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमधील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक या पदांना लागू होणार नाहीत.

३. या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) “ प्रशासकीय विभाग ” याचा अर्थ, राज्य शासनाच्या मंत्रालयीनस्तरावरील विभाग ;

(ब) “ नियुक्ती प्राधिकारी ” याचा अर्थ “ गट अ ” आणि “ गट ब ” (राजपत्रित व अराजपत्रित) सेवेत किंवा त्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत नेमणूक करण्यास सक्षम असलेला प्राधिकारी, असा आहे ;

(क) “ आयोग ” याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, असा आहे ;

(ड) “ शासन ” याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(इ) “ गट अ ” व “ गट ब ” पदे याचा अर्थ, राज्य शासनाच्या आदेशानुसार, वेळोवेळी गट “ अ ” आणि गट “ ब ” म्हणून वर्गीकृत केलेली शासनाच्या नियंत्रणाखालील पदे, असा आहे ;

(फ) “ महसुली विभाग ” याचा अर्थ, या अनुसूचीमध्ये नमूद केलेले राज्यातील सहा महसुली विभाग, असा आहे;

(ग) “ अनुसूची ” याचा अर्थ, या नियमासोबत जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(ह) “ निवडसमिती ” याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून महाराष्ट्र लोकसेवा आयोग ( विचारविनियमापासून सूट) विनियम, १९६५ नुसार वगळलेल्या गट “ अ ” व गट “ ब ” मधील पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी स्थापन केलेली निवडसमिती, असा आहे ;

(ज) “ राज्य ” याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(ल) “ राज्यस्तरीय विभागप्रमुख ” म्हणजे राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या राज्यस्तरीय यंत्रणेचे प्रमुख.

४. गट “ अ ” व गट “ ब ” मधील सरळसेवेने तसेच पदोन्नतीने भरण्यात येणाऱ्या पदांवर या नियमावलीच्या अनुसूचीत नमूद केलेल्या सहा महसुली विभागात या नियमांनुसार नियुक्ती करण्यात येईल.

५. अशी नियुक्ती करण्यापूर्वी शासनाचे संबंधित प्रशासकीय विभाग आपल्याकडील गट “ अ ” व गट “ ब ” मधील प्रत्येक संवर्गातील सरळसेवा कोट्याची व पदोन्नती कोट्याची पदे महसूल विभाग निहाय निश्चित करेल.

६. अशा निश्चित केलेल्या सरळसेवा कोट्याच्या व पदोन्नती कोट्याच्या पदांवर नियुक्ती देताना सहा महसुली विभागांतील वाटप पुढीलप्रमाणे करण्यात येईल :—

(अ) गट “ अ ” व गट “ ब ” पदावर सरळसेवेने नियुक्तीकरिता, यथास्थिती, आयोग किंवा निवडसमिती यांच्याकडून शिफारस किंवा गुणवत्ता यादी प्राप्त झाल्यावर, विहित प्रमाणपत्रे व अन्य कागदपत्रांची पडताळणी झाल्यावर, प्रत्यक्ष महसुली विभाग वाटप करण्यात येईल त्यावेळेस त्या संवर्गात सरळसेवा कोट्यातील एकूण रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन, गुणवत्ता यादीतील क्रमांकानुसार अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या क्रमानुसार **चक्राकार** पद्धतीने, महसुली विभाग वाटप करण्यात यावे. या चारही महसुली विभागांतील सरळसेवा कोट्याची रिक्त पदे भरल्यानंतर गुणवत्ता यादीतील उर्वरित उमेदवारांना कोकण विभाग व पुणे विभाग या क्रमाने विभाग वाटप करावा.

(ब) गट “ अ ” व गट “ ब ” पदावर पदोन्नतीने नियुक्तीकरिता निवडसूचीत समावेश असलेल्या अधिकाऱ्याला प्रत्यक्ष महसुली विभाग वाटप करण्यात येईल त्यावेळेस त्या संवर्गात पदोन्नती कोट्यातील एकूण रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन, त्याच्या संबंधित निवडसूचीतील क्रमांकानुसार, अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या क्रमानुसार **चक्राकार** पद्धतीने, महसुली विभाग वाटप करण्यात यावे. या चारही महसुली विभागांतील पदोन्नती कोट्याची रिक्त पदे भरल्यानंतर निवडसूचीतील उर्वरित अधिकाऱ्यांना कोकण विभाग व पुणे विभाग या क्रमाने विभाग वाटप करावा :

परंतु असे की, निवडसूचीतील गोपनीय अहवाला अभावी खुली ठेवलेली, जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त नसलेली आणि विभागीय चौकशी किंवा न्यायालयीन कार्यवाही चालू असलेली प्रकरणे वगळून उर्वरित अधिकाऱ्यांना एकाचवेळी महसुली विभाग वाटप करण्यात यावे. अशाप्रकारे वगळण्यात आलेल्या प्रकरणी अंतिम निर्णयानंतर स्वतंत्रपणे महसुली विभाग वाटप करण्यात यावे.

७. खालील प्रकरणे नियम ४ व ६ मधून वगळण्यात यावीत :—

I. ज्या अधिकाऱ्यास विभाग वाटपाच्यावेळी सेवानिवृत्तीस १ वर्षापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे ;

II. जे अधिकारी स्वत: अपंग आहेत ;

III. ज्या अधिकाऱ्याचा जोडीदार किंवा त्याचे मूल मतिमंद आहे ;

IV. ज्या स्त्री अधिकारी विधवा किंवा परित्यक्त्या आहेत,

अशा प्रकरणी संबंधित प्रशासकीय विभागाने रिक्त पदांची उपलब्धता विचारात घेऊन, अशा अधिकाऱ्यास त्याच्या सोयीचा महसुली विभाग वाटप करावा.

८. (१) सरळसेवेने नियुक्त झालेल्या उमेदवारांच्या बाबतीत,—

(अ) गट " अ " संवर्गात नियुक्त झालेल्या उमेदवारांनी त्या महसुली विभागात किमान सहा वर्षे इतका सेवा कालावधी पूर्ण करणे आवश्यक राहील ;

(ब) तसेच, गट " ब " संवर्गात नियुक्त झालेल्या उमेदवारांनी त्या महसुली विभागात किमान नऊ वर्षे इतका सेवा कालावधी पूर्ण करणे आवश्यक राहील ;

(२) वरीलप्रमाणे पदस्थापना दिल्यावर यथास्थिती सहा वर्षे अथवा नऊ वर्षे सेवा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी पुढील पदोन्नती मिळत असल्यास पदोन्नती नंतरही त्याच महसुली विभागात पदस्थापना करण्यात येईल :

परंतु, पुढील पदोन्नतीच्यावेळी त्या महसुली विभागात पद उपलब्ध नसल्यास यथास्थिती सहा अथवा नऊ वर्षे सेवा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी पदोन्नतीने अन्य महसुली विभागात पदस्थापना देता येईल :

परंतु असे की, पद उपलब्ध नसल्याने त्या महसुली विभागात यथास्थिती सहा वर्षे अथवा नऊ वर्षे सेवा कालावधी पूर्ण झालेला नाही अशा अधिकाऱ्यांच्या बाबतीत उर्वरित कालावधीकरिता पुन्हा मूलतः वाटप झालेल्या महसुली विभागात पदोन्नतीने अथवा बदलीने पदस्थापना करता येईल :

परंतु आणखी असे की, महसुली विभाग वाटप केल्यानंतर त्या महसुली विभागात यथास्थिती सहा वर्षे अथवा नऊ वर्षे सेवा कालावधी पूर्ण झाल्यावर अशा अधिकाऱ्यास त्या महसुली विभागाव्यतिरिक्त पद उपलब्धतेनुसार अन्य कोणत्याही महसुली विभागात पदस्थापना देण्यात येईल व ती त्या अधिकाऱ्याने स्वीकारणे बंधनकारक राहील.

९. (१) पदोन्नतीने नियुक्त झालेल्या उमेदवारांच्या बाबतीत,—

(अ) गट " अ " संवर्गात नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांनी त्या महसुली विभागात किमान तीन वर्षे इतका सेवा कालावधी पूर्ण करणे आवश्यक राहील ;

(ब) तसेच गट " ब " संवर्गात नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांनी त्या महसुली विभागात किमान सहा वर्षे इतका सेवा कालावधी पूर्ण करणे आवश्यक राहील,

(२) वरीलप्रमाणे पदस्थापना दिल्यावर यथास्थिती तीन वर्षे अथवा सहा वर्षे सेवा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी पुढील पदोन्नती मिळत असल्यास पदोन्नती नंतरही त्याच महसुली विभागात पदस्थापना करण्यात येईल :

परंतु, पुढील पदोन्नतीच्यावेळी त्या महसुली विभागात पद उपलब्ध नसल्यास यथास्थिती तीन अथवा सहा वर्षे सेवा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी पदोन्नतीने अन्य महसुली विभागात पदस्थापना देता येईल :

परंतु असे की, पद उपलब्ध नसल्याने त्या महसुली विभागात यथास्थिती तीन वर्षे अथवा सहा वर्षे सेवा कालावधी पूर्ण झालेला नाही अशा अधिकाऱ्यांच्या बाबतीत उर्वरित कालावधीकरिता पुन्हा मूलतः वाटप झालेल्या महसुली विभागात पदोन्नतीने अथवा बदलीने पदस्थापना करता येईल :

परंतु आणखी असे की, महसुली विभाग वाटप केल्यानंतर त्या महसुली विभागात यथास्थिती तीन वर्षे अथवा सहा वर्षे सेवा कालावधी पूर्ण झाल्यावर अशा अधिकाऱ्यास त्या महसुली विभागाव्यतिरिक्त पद उपलब्धतेनुसार अन्य कोणत्याही महसुली विभागात पदस्थापना देण्यात येईल व ती त्या अधिकाऱ्याने स्वीकारणे बंधनकारक राहील.

१०. गट " अ " व गट " ब " मधील प्रत्येक संवर्गातील सरळसेवा कोट्याच्या व पदोन्नती कोट्याच्या महसुली विभागनिहाय निश्चित केलेल्या पदांवर प्रत्येक महसुली विभागातील कार्यरत अधिकाऱ्यांची पदनिहाय स्वतंत्र यादी नियुक्ती प्राधिकाऱ्याने ठेवणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक राहील.

११. (१) या नियमातील तरतुदीनुसार गट " अ " पदावर सरळसेवेने आणि पदोन्नतीने नियुक्ती करताना महसुली विभाग वाटपाचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात येत आहेत आणि यासाठी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाची सहमती घेण्याची आवश्यकता नाही.

(२) या नियमांतील तरतुदीनुसार गट " ब " पदावर सरळसेवेने आणि पदोन्नतीने नियुक्ती करताना महसुली विभाग वाटपाचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील राज्यस्तरीय विभाग प्रमुख यांना प्रदान करण्यात येत आहेत आणि यासाठी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाची सहमती घेण्याची आवश्यकता नाही.

१२. या नियम तरतुदीनुसार महसुली विभाग वाटप केल्यानंतर, वाटप करण्यात आलेल्या विभागात किमान एक वर्ष सेवा पूर्ण केल्यानंतरच, खालील कारणास्तव संबंधित अधिकारी विभाग बदलून मिळण्यासाठी अर्ज करू शकेल :—

**(अ)** शासकीय अधिकारी स्वतः किंवा यथास्थिती पती वा पत्नी वा त्याची मुले वा त्यांच्यावर अवलंबून असलेले शासकीय अधिकाऱ्याचे आई किंवा वडील यांचे पुढील आजार :—

१. हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे

२. मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया किंवा किडनी डायलेसिस

३. कर्करोग

४. ब्रेन ट्युमर किंवा मेंदूवरील शस्त्रक्रिया

५. निश्चेतनावस्था (कोमा)

६. मनोविकृतीने ग्रस्त

**(ब) पती-पत्नी एकत्रिकरण**—केंद्र किंवा राज्य शासकीय किंवा निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती अथवा शासकीय शैक्षणिक संस्थेमध्ये (शासकीय अनुदानित खाजगी शिक्षणसंस्था खेरीज) पती किंवा पत्नी कार्यरत असल्यास,

(i) कोकण व पुणे महसुली विभागातून केवळ नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक हे महसुली विभागच बदलून देता येतील.

(ii) नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या पैकी एका महसुली विभागाऐवजी दुसरा महसुली विभाग बदलून देता येईल.

**(क) आपसात महसुली विभाग बदलून देणे—**

(i) सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांना वाटून दिलेला महसुली विभाग आपसात बदली (Mutual Change) या कारणास्तव बदलावयाची मागणी केल्यास, केवळ सरळसेवेने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांमध्येच आपसात महसुली विभाग बदल करता येईल.

(ii) पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांना वाटून दिलेला महसुली विभाग आपसात बदली (Mutual Change) या कारणास्तव बदलावयाची मागणी केल्यास, केवळ पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कोणत्याही निवडसूचीतील अधिकाऱ्यांमध्येच आपसात महसुली विभाग बदल करता येईल.

तथापि, अशा प्रकारे आपसात महसुली विभाग बदली या कारणास्तव महसुली विभाग बदल करताना पुणे व कोकण महसुली विभागातून नागपूर किंवा अमरावती किंवा औरंगाबाद किंवा नाशिक महसुली विभागात बदलून जाणाऱ्या अधिकाऱ्यांनी प्रथम अशा बदलून दिलेल्या महसुली विभागात रुजू होणे आवश्यक आहे.

१३. या नियमानुसार वाटप झालेला महसुली विभाग उपरोक्त नियम १२ मध्ये नमूद केलेल्या कारणास्तव संबंधित प्रशासकीय विभाग बदलून देऊ शकेल. यासाठी वेगळ्याने सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

१४. सदरहू नियम **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास, जी प्रकरणे महसुली विभाग वाटपासाठी व वाटप झालेला महसुली विभाग बदलून देण्यासाठी प्रलंबित असतील, ती प्रकरणे या नियमावलीतील तरतुदीनुसार निकाली काढली जातील.

**अनुसूची**

(**पहा** नियम ४)

| अ.क्र. (१) | महसुली विभाग (२) | जिल्हे (३) |
|---|---|---|
| १ | नागपूर | नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा (एकूण सहा जिल्हे) |
| २ | अमरावती | अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ (एकूण पाच जिल्हे) |
| ३ | औरंगाबाद | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बीड (एकूण आठ जिल्हे) |
| ४ | नाशिक | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर (एकूण पाच जिल्हे) |
| ५ | कोकण | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग (एकूण सात जिल्हे) |
| ६ | पुणे | पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर (एकूण पाच जिल्हे) |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. भगवान सहाय,**
शासनाचे अपर मुख्य सचिव (सेवा).

क्रमांक एसआरव्ही. २०१५/प्र.क्र. १५६/कार्या-१२
**सामान्य प्रशासन विभाग,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २८ एप्रिल २०१५

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,

५. सर्व मा. संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,

६. मा. मुख्य सचिव,

७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,

८. सर्व मंत्रालयीन विभाग,

९. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

१०. *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,

११. *प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

१२. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

१३. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,

१४. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मंबई,

१५. *सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,

१६. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,

१७. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,

१८. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,

१९. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,

२०. *सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई,

२१. *प्रबंधक, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई ४०० ००१,

२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (२ प्रती प्रसिद्धीकरिता),

२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

२४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,

२५. सर्व विभागीय आयुक्त,

२६. सर्व जिल्हाधिकारी,

२७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

२९. सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,

३०. सामान्य प्रशासन विभाग/का. ३९ (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धीकरिता),

३१. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)

३२. बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.पी. भवन, प्लॉट नं. ८३-अे, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई ४०० ०७४ (५ प्रती)

३३. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरेक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२० (५ प्रती)

३४. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई ४०० ००४ (५ प्रती)

३५. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०० ०१३ (५ प्रती),

३६. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२५ (५ प्रती),

३७. नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१ (५ प्रती),

३८. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई ४०० ०२८ (५ प्रती),

३९. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, कृष्णाकुंज, एम. बी. राऊत रोड, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०० ०२८ (५ प्रती),

४०. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,

४१. निवड नस्ती.

(*पत्राने)

**राजेंद्र सुर्वे,**
शासनाचे सहसचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 28th April 2015

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. SRV. 2015/C.R. 156/Desk 12.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra, in supersession of the Divisional Cadre Structure and Divisional Cadre Allotment for direct appointment by nomination to the posts of Group " A " and Group " B " (Gazetted and Non-Gazetted) of the Government of Maharashtra Rules, 2010 and the Divisional Cadre Structure and Divisional Cadre Allotment for appointment by promotion to the posts of Group " A " and Group " B " (Gazetted and Non-Gazetted) of the Government of Maharashtra Rules, 2010 and also in supersession of all the existing Government Resolutions, Orders or Instruments made in this behalf, hereby makes the following rules :—

1. These rules may be called the Revenue Division Allotment for appointment by nomination and promotion to the posts of Group " A " and Group " B " (Gazetted and Non-Gazetted) of the Government of Maharashtra Rules, 2015.

2. These rules shall be applicable for Revenue Division Allotment to the posts in Group " A " and Group " B " (Gazetted and Non-Gazetted) to be filled up by nomination and promotion from the date of publication of these rules in the *Maharashtra Government Gazette* :

Provided that these rules shall apply only to such posts which are transferable at State level as per the recruitment rules :

Provided further that these rules shall not be applicable to the posts of Professor, Associate Professor and Assistant Professor in the Government Medical Colleges and Hospitals, which are under the Medical Education and Drugs Department.

3. In these Rules, unless the context requires otherwise,—

(*a*) " Administrative Department " means a department of Government of Maharashtra of Mantralaya level as specified in Rules of Business ;

(*b*) " Appointing Authority " means an authority competent to make appointment to any Group " A " and Group " B " (Gazetted and Non-Gazetted) cadre or service or post ;

(*c*) " Commission " means the Maharashtra Public Service Commission ;

(*d*) " Government " means the Government of Maharashtra ;

(*e*) " Group " A " and Group " B " posts " means the Group " A " and Group " B " posts under the control of the Government which are classified as such by a Government Order, from time to time;

(*f*) " Revenue Division " means one of the six Revenue Divisions of the State mentioned in the Schedule;

(*g*) " Schedule "means the Schedule appended to these rules;

(*h*) " Selection Committee "means the Selection Committee constituted for appointment to Group " A " and Group " B " posts which are exempted from purview of the Maharashtra Public Service Commission as per the Maharashtra Public Service Commission (Exemption from Consultation ) Regulations, 1965 ;

(*i*) " State " means the State of Maharashtra.

(*j*) " State Level Head of Departments " means the State Level Head of an organization under the control of an Administrative Department of the Government.

4. The appointments shall be made to the posts of Group " A " and Group " B " by nomination and promotion in six Revenue Divisions mentioned in the Schedule appended here to as per these rules.

5. Before allotting Revenue Divisions, every administrative department of the Government shall determine Revenue Division-wise its posts of nomination quota and promotion quota in each Group " A " and Group " B " cadre.

6. While making appointments to such determined posts of nomination quota and promotion quota, allotment of Revenue Divisions shall be made as follows :—

(*a*) For appointment to the posts in Group " A " and Group " B " by nomination on receipt of recommendation or merit list from the Commission or Selection Committee, as the case may be, after scrutiny of the necessary certificates and other documents, revenue divisions as mentioned in the schedule shall be allotted to the candidates by rotation as per their serial numbers in the merit list,by taking into consideration total vacancies in the nomination quota existing at that time, in the sequential order of Nagpur, Amravati, Aurangabad and Nashik Revenue Divisions. After all the vacant posts in nomination quota in the above four Revenue Divisions are filled up, the Konkan Division and Pune Division shall be allotted alternately to the remaining candidates in the merit list.

(*b*) For appointment to the posts in Group " A " and Group " B " by promotion to the officers whose names are included in the select list for promotion Revenue Divisions as mentioned in the schedule shall be allotted to the officers by rotation as per their serial numbers in the select list, by taking into consideration total vacancies in the promotion quota existing at that time,in the sequential order of Nagpur, Amravati, Aurangabad and Nashik Revenue Divisions. After all the vacant posts in promotion quota in the above four Revenue Divisions are filled up, the Konkan Division and Pune Division shall be allotted alternately to the remaining candidates in the select list.

For appointments to posts by promotion, the Revenue Divisions shall be allotted to all officers in the select list at the same time except in cases which are kept open due to non-availability of confidential reports, non-availability of caste validity certificates and in which departmental enquiries are in progress or where the subject matter is *sub-judice.* In case of latter such allotment of Revenue Division shall be made separately after final decisions on them.

7. The following cases shall be exempted from the provisions of the rules 4 and 6 :—

(*a*) An officer who is due for retirement in less than one year at the time of Revenue Division Allotment ;

(*b*) An officer who himself or herself is handicapped ;

(*c*) An officer whose spouse or child is mentally retarded ;

(*d*) A woman officer who is widow or abandoned.

In such cases, the concerned Administrative Department will, subject to the availability of vacant posts, allot a Revenue Division, which is convenient to such an officer.

8. (1) A candidate appointed by nomination,—

(*a*) in Group " A " cadre shall be required to complete service of minimum six years in the allotted Revenue Division ;

(*b*) in Group " B " cadre shall be required to complete service of minimum nine years in the allotted Revenue Division.

(2) After allottment of the Revenue Division if an officer gets promoted before completion of the period of six years or nine years, as the case may be, he or she shall be given posting in the same Revenue Division :

Provided that, if the post is not available at the time of such promotion in that Revenue Division, then before completion of the period of six years or nine years, as the case may be, a posting on promotion may be given in any other Revenue Division :

Provided further that,if the period of six years or nine years, as the case may be, is not completed due to non-availability of posts in that Revenue Division, then in case of such officers posting for remaining period shall be given again either on promotion or transfer in the originally allotted Revenue Division :

Provided also that, after completion of a period of six years or nine years, as the case may be, in the originally allotted Revenue Division, such officer may be posted in any other Revenue Division as per the availability of the posts.

9. (1) An officer appointed on promotion,—

(*a*) in Group "A" cadre shall be required to complete service of minimum three years in the allotted Revenue Division;

(*b*) in Group "B" cadre shall be required to complete service of minimum six years in the allotted Revenue Division.

(2) After allotment of the Revenue Division, if an officer gets promoted before completion of the period of three years or six years, as the case may be, he or she shall be given posting in the same Revenue Division :

Provided that, if the post is not available at the time of such promotion in that Revenue Division, then before completion of the period of three years or six years, as the case may be, a posting on promotion may be given in any other Revenue Division :

Provided further that, if the period of three years or six years, as the case may be, is not completed due to non-availability of posts in that Revenue Division, then in case of such officers posting for the remaining period shall be given again either on promotion or transfer in the originally allotted Revenue Division :

Provided also that, after the completion of a period of three years or six years, as the case may be, in the allotted Revenue Division, such officer may be posted in any other Revenue Division as per the availability of the posts.

10. Lists of the officers working in every Revenue Division against the determined nomination quota and promotion quota posts of every Group "A" cadre and Group "B" cadre shall be maintained and updated by the appointing authority, from time to time.

11. (1) Powers to allot Revenue Divisions to officers appointed by nomination and by promotion to the posts of Group "A" cadres as per provisions of these rules, are hereby delegated to the concerned Administrative Departments.It shall not be necessary for them to obtain the concurrence of the General Administration Department for this purpose.

(2) Power to allot the Revenue Divisions to officers appointed by nomination and by promotion to the posts of Group "B" cadres as per the provisions of these rules, are hereby delegated to concerned State level heads of departments under control of the concerned Administrative Departments. It shall not be necessary for them obtain the concurrence of the General Administration Department for this purpose.

12. After completion of service of one year in the allotted Revenue Divisions, an officer may apply for change of the Revenue Division on the following grounds, namely :—

(*a*) these illnesses of the officer himself or of his or her spouse or children or father or mother, who are dependent on him or her :—

(*i*) Cases of Heart Surgery.

(*ii*) Kidney Transplantation or Kidney Dialysis.

(*iii*) Cancer.

(*iv*) Brain Tumor or Brain Surgery.

(*v*) Coma.

(*vi*) Mental Disorder.

(*b*) Postings of spouses together at the same place or location :

If husband or wife is in service in an office of Central or State Government, Semi-Government Organization, Municipal Corporation, Municipal Council, Zilla Parishad, Panchayat Samiti or Government Educational Institution (excluding Government aided private educational institutions),—

(*i*) a change of the Revenue Division may be allowed only from Konkan and Pune Revenue Divisions to Nagpur, Amravati, Aurangabad and Nashik Revenue Divisions; and

(*ii*) Nagpur, Amravati, Aurangabad and Nashik Revenue Divisions may be inter-changed amongst themselves.

(*c*) Mutual change in allotted Revenue Divisions :—

(*i*) If request for change in the Revenue Division on mutual basis is received from an officer appointed by nomination, the Revenue Division may be changed only with another officer appointed by nomination.

(*ii*) If request for change in the Revenue Division on mutual basis is received from an officer appointed by promotion, the Revenue Division may be changed only with another officer appointed by promotion :

Provided that, while allowing such change in the Revenue Division on mutual basis, the officer whose Revenue Division is changed from Konkan or Pune Revenue Division to either Nagpur or Amravati or Aurangabad or Nashik Revenue Division, will be required to join first in the newly allotted Revenue Division.

13. The concerned administrative Departments may allow change in the Revenue Divisions as per the provisions of rule 12, and it shall not be necessary to obtain the concurrence of the General Administration Department for this purpose.

14. All the cases pending for the allotment of Revenue Divisions and the applications pending for the change in Revenue Divisions,on the date of the publication of these rules in the *Maharashtra Government Gazette* shall be disposed of as per the provisions of these rules.

*Schedule*

(*see* rule 4)

| Sr. No. (1) | Revenue Divisions (2) | | Districts (3) |
|---|---|---|---|
| 1 | Nagpur | .. | Nagpur, Bhandara, Gondia, Gadchiroli, Chandrapur, Wardha (Total Six Districts) |
| 2 | Amravati | .. | Amravati, Akola, Buldhana, Washim, Yavatmal (Total Five Districts) |
| 3 | Aurangabad | .. | Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Nanded, Latur, Osmanabad Beed (Total Eight Districts) |
| 4 | Nashik | .. | Nashik, Dhule,Nandurbar, Jalgaon, Ahmednagar (Total Five Districts) |
| 5 | Konkan | .. | Mumbai City, Mumbai Suburban, Thane, Palghar, Raigad, Ratnagiri Sindhudurg (Total Seven Districts) |
| 6 | Pune | .. | Pune, Satara, Sangli, Kolhapur, Solapur (Total Five Districts) |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. BHAGWAN SAHAI,
Additional Chief Secretary
(Services) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

No. SRV. 2014/C.R.- 156/Desk-12
GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT
Mantralaya, Mumbai 400 032
Dated the 28th April 2015

1. The Secretary to the Governor, Raj Bhavan, Malbar Hill, Mumbai.
2. The Principal Secretary to the Chief Minister,
3. The Private Secretary to all Ministers/State Ministers,
4. Hon'ble Opposition Leader, Legislative Council of the State of Maharashtra/ Legislative Assembly of the State of Maharashtra,
5. All Hon'ble Members of the Parliament/Members of the Legislative Council of the State of Maharashtra/ Members of the Legislative Assembly of the State of Maharashtra,
6. The Chief Secretary,
7. All Additional Chief Secretaries/Principal Secretaries/Secretaries of Mantralaya Departments,
8. All Mantralaya Departments,
9. *The Registrar, High Court (Original Side), Mumbai,
10. *The Registrar, High Court (Appellate Side), Mumbai,
11. *The Registrar, Office of the Loka Ayukta and Upa-Loka Ayukta, Mumbai,
12. *The Secretary, Maharashtra Public Service Commission, Mumbai,
13. *The Principal Secretary, Secretariat of Maharashtra Legislature (Assembly), Mumbai,
14. *The Principal Secretary, Secretariat of Maharashtra Legislature (Council), Mumbai,
15. *The Secretary, State Election Commission, New Administrative Building, Mumbai,
16. *The Accountant General, Maharashtra-1 (Account and Entitlement), Maharashtra, Mumbai,
17. *The Accountant General, Maharashtra-1 (Audit), Maharashtra, Mumbai,
18. *The Accountant General, Maharashtra-2 (Account and Entitlement), Maharashtra, Nagpur,
19. *The Accountant General, Maharashtra-2 (Audit), Maharashtra, Nagpur,
20. *The Secretary, Office of the Chief Information Commissioner of the State, New Administrative Building., Mumbai,
21. *The Registrar, State Human Rights Commission, Mumbai 400 001,
22. The Director General of Information and Public Relations, Mumbai (2 copies for publicity),
23. Pay and Accounts Officer, Mumbai,
24. Resident Audit Officer, Mumbai,
25. All Divisional Commissioners,
26. All Collectors,
27. All Chief Executive Officers of Zilla Parishads,
28. All District Treasury Officers,
29. All Heads of Departments and Heads of Offices under the All Departments of Mantralaya,
30. General Administration Department/Desk 39 (For publishing on website),
31. The Librarian, Secretariat of Maharashtra Legislature, Library, 6th Floor, Vidhan Bhavan, Mumbai 400 032 (10 copies),
32. Bahujan Samaj Party, State Secretary, Maharashtra State, B.S.P. Bhavan, Plot No. 83-A, Collector Colony, Chembur, Mumbai-74 (5 copies),
33. Bhartiya Janata Party, Maharashtra State, C.D.O. Barrack No. 1, Opposite Yogaksham, Vasantrao Bhagwat Chowk, Nariman Point, Mumbai-20 (5 copies),

34. Bhartiya Communist Party, Maharashtra Committee, 314, Rajbhavan, S.V.Patel Road, Mumbai-4 (5 copies),

35. Bhartiya Communist Party (Marxvadi), Maharashtra Committee, Janshakti Hall, Globe Mills Palace, Worli, Mumbai-13 (5 copies),

36. Indian National Congress, Maharashtra State Congress (I) Committee, Tilak Bhavan, Kakasaheb Gadgil Road, Dadar, Mumbai-25 (5 copies),

37. Nationalist Congress Party, Rashtravadi Bhavan, Free Press Journal Road, Nariman Point, Mumbai-21 (5 copies),

38. Shivsena, Shivsena Bhavan, Gadkari Chowk, Dadar, Mumbai-28 (5 copies),

39. Maharashtra Navnirman Sena, Krishnakunj, M.B.Raut Road, Shivaji Park, Dadar, Mumbai-28 (5 copies),

40. All Desks of General Administration Department,

41. Select File.

(* By Letter)

RAJENDRA SURVE,
Joint Secretary to Government.